# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ८० / २०२५

नवीन कृषी पंप वीज जोडणी न देता वीज देयक दिल्याबाबत

अंजनाबाई भिमराव बोरसे ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, डोंडायचा (महावितरण) ............................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अंबादास पवार, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादी तर्फे :- १) भाऊसाहेब पाटील, कार्यकारी अभियंता, डोंडायचा
२) गणराज पाटील, उपकार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १७ सप्टबर २०२५

आदेश पारित दिनांक :- ८ डिसेंबर २०२५

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, नाशिक परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक १ जुलै २०२५ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १४ ऑगष्ट २०२५ रोजी दाखल केले. मंचाने त्यांच्या दिनांक १ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये अभिवेदन नामंजूर केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२. प्रतिवादी यांनी त्यांच्या उत्तरातील व दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे. *[वीज लोकपालांचे निरीक्षण आणि टिप्पण्या आवश्यक असल्यास 'नोटस' अंतर्गत नोंदवण्यात येतात.]*

- अपिलार्थी अंजनाबाई भिमराव बोरसे यांनी नवीन कृषीपंप वीज जोडणीकरीता दिनांक १३ ऑगष्ट 2021 रोजी महावितरण शिरपूर कार्यालियाकडे अर्ज (क्र.३३३१४९५३) सादर केला. त्यानंतर महावितरण कार्यालियाकडून अपिलार्थीस दिनांक १९ ऑगष्ट 2021 रोजी कोटेशन देण्यात आले. अपिलार्थीने सदर कोटेशनचा भरणा दिनांक १८ सप्टेंबर 2021 रोजी केला. त्याबाबतची माहिती तक्ता १ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता १

| Name of Consumer | Address | Load applied & Date of Application | Consumer No. allotted at the time of demand note | Date of demand note issued on 19.08.2021 | | Date of payment of demand notice |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **Details** | **Rs.** | |
| Anjanabai Bhimaro Borse | 11/1 Mukhed, Tal-Shirpur,Dist-Dhule | 7 HP on 13.08.2021 | 94960001227 | First Security Deposit | 3500 | Rs.12,185/- paid on 18.09.2021 |
| | | | | Service Connection charges | 7200 | |
| | | | | Processing Fee | 160 | |
| | | | | GST | 1325 | |
| | | | | **Total** | **12185** | |

अपिलार्थीसोबत खालील नमुद केलेल्या बाजूच्या ग्राहकांचे शेतीपंपासाठी अर्ज आले होते. सदरहू ग्राहकांची नावे व त्यांना देण्यात आलेल्या अंदाजपत्रकाची माहिती खालीलप्रमाणे तक्ता २ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता २

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

| Name of Consumer | Application No. | Application date | Date of sanction demand note | Quotation details | D.D.C. Bank Payment |
|---|---|---|---|---|---|
| Anjanabai Bhimrao Borse | 33314953 | 13.08.2021 | 19.08.2021 | 12185/- | 18.09.2021 |
| Italyya Sakharam Pawra | 33436411 | 19.08.2021 | 19.08.2021 | 11185/- | 21.09.2021 |
| Bhavsing Sures Pawra | 27108083 | 24.07.2020 | 19.08.2021 | 11185/- | 21.09.2021 |
| Gundya Dhisa Pawra | 33436703 | 19.08.2021 | 19.08.2021 | 11185/- | 22.09.2021 |
| Mukesh Khumsing Pawra | 33313781 | 13.08.2021 | 13.08.2021 | 14685/- | 21.09.2021 |

सदर कामासाठी वर नमुद केलेल्या पाच ग्राहकांचे एकत्रित अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यानुसार एबी केबल द्वारे पाचही ग्राहकांना दिनांक ३० मार्च २०२३ रोजी वीज जोडणी देण्यात आली. कृषीपंप ग्राहकांचे बिलींग हे त्रमासीक पध्दतीचे असून अपिलार्थीची वीज जोडणी ही दिनांक ३० मार्च २०२३ ला दिल्यामुळे (त्यावेळी मार्च २०२३ चे बिलींग वीज जोडणीच्या पर्वी झाले असल्यामुळे अपिलार्थीस मार्च २०२३ चे वीज देयक देण्यात आलेले नाही) माहे जून २०२३ त्रैमासीक चे प्रथम वीज देयक देण्यात आल. तेव्हापासून अपिलार्थी नियमीतपणे वीजेचा वापर करत आहेत. आणि वापरलेल्या वीजेचेच वीज देयके देण्यात आली आहेत. **अपिलार्थीने आतापर्यंत कोणत्याही वीज देयकांचा भरणा केलेला नाही. तरीसुध्दा शासकीय धोरण म्हणून अपिलार्थीची वीज जोडणीचा वीज पुरवठा खंडीत कलेला नाही.**

- अपिलार्थी व ग्रुप वीज जोडणी एबी केबल टाकून खालीलप्रमाणे देण्यात आली.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| AG Existing Consumers | | Anjanabai Bhimrao Borse C. No. 094960001227 | | Mukesh Khumsing Pawra, C. No. 094960001189 | | Italyya Sakharam Pawra, C. No. 094960001197 | |
| | | | | | | | |
| | | | | | Bhavsing Sures Pawra, C. No. 094960001219 | | Gundya Dhisa Pawra, C. No. 094960001201 |

- ह्या सर्व वीज जोडण्यांचे ग्राहक क्रमांकास एकाचवेळी मंजूरी दिल्यामुळे ते जवळपासचे असल्याचे निदर्शनास येते.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- तसेच 'महावितरण', ही शासकीय उपक्रम असलेली कंपनी असल्याने शासनाच्या कोणत्याही अनुदानाचे नुकसान झालेले नाही. महावितरणने अपिलार्थीच्या शेताची भौगोलिक परिस्थती पाहता संपर्ण पायाभूत सुविधा देत वीज जोडणी दिलेली आहे. अपिलार्थीस वीज पुरवठयापासून वंचीत ठेवण्यात आलेले नाही, त्यामुळे कोणतीही दंडात्मक कारवाई करू नये.

- अपिलार्थीस दिनांक ३० मार्च २०२३ रोजी कंपनी नियमाप्रमाणे Unmetered Tariff नुसार वीज जोडणी देण्यात आलेली आहे व त्याचे पुरावे सुध्दा सादर केलेले आहेत. तसेच, मार्च २०२२ ते डिसेंबर २०२२ च्या CPL (ग्राहक वैयक्तिक खातेवही) नुसार ग्राहकाचा स्टेटस प्रलंबित (paid pending) असा दर्शविलेला आहे. दिनांक ३० मार्च २०२३ ला वीज जोडणी दिल्यानंतर जून २०२३ पासून अपिलार्थीची वीज देयक आकारणी करण्यात आलेली सदर बाब CPL वरून स्पष्ट होत.

- महावितरणने दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी सदर जागेची स्थळतपासणी केली असता तेथे वीज जोडणी वापरात असल्याचे निदर्शनास आले. सदर बाब अपिलार्थीना दाखविण्यात आली होती. सदर वीज जोडणी असलेल्या पोल चे फोटो व <u>शेतीचे ओलीत क्षेत्र</u> रेकॉर्डवर ठेवण्यात आलेले आहे.

- प्रतिवादीनी अशी विनंती केली की, अपिलार्थीने वीजेचा वापर केला असल्यामुळे त्यामुळे अपिलार्थीस दिलेले वीज देयक रद्द करण्यात येऊ नये.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे पुढील प्रमाणे.

- अपिलार्थी अंजनाबाई भिमराव बोरसे हे, राहणार मुखेड, तालूका शिरपूर, जिल्हा धुळे येथील कृषो वीज ग्राहक (क्र.०९४९६०००१२२७) आहेत. अपिलार्थीने नवीन कृषी वीज जोडणीकरीता दिनांक १३ ऑगष्ट २०२१ रोजी महावितरण शिरपूर कार्यालयाकडे अर्ज केला. त्यानंतर महावितरण कार्यालयाकडून अपिलार्थीस दिनांक १९ ऑगष्ट २०२१ रोजी कोटेशन देण्यात आले. अपिलार्थीने सदर कोटेशनचा भरणा दिनांक १८ सप्टेंबर २०२१ रोजी केला. परंतू आजपर्यंत वीज कायदा 2003

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

मधील नियमावलीमध्ये नमुद केलेल्या कालावधीत वीज पुरवठा दिला नाही. *(नोंटः प्रतिवादीने सादर केलेले दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या फोटोमध्ये अपिलार्थींना वीज जोडणी दिल्याचे निदर्शनास येते).*

- माननीय आयोगाच्या निर्देशानूसार महावितरण अपिलार्थीस भरपाईसह वीज पुरवठा करण्यास बांधील आहे.

- वीज जोडणीसाठी अपिलार्थीने प्रतिवादीकडे पाठपुरावा केला असता प्रतिवादीकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. परंतू त्यानंतर प्रतिवादीने अपिलार्थीस ग्राहक क्र.०९४९६०००१२२७ चे जून २०२३ चे रु.७७७०/- चे वीज देयक दिले व वीज देयकावर वीज जोडणी दिल्याची तारीख ३० मार्च २०२३ अशी नोंद आहे. अपिलार्थीने नमुद केले की, प्रतिवादीने अपिलार्थीची फसवणूक करून खोटी वीज देयके तयार करून शासनाकडून अनुदानही लाटले असावे.

- वीज कायदा २००३ नुसार अपिलार्थीस वीज पुरवठा वेळेत करणे हे प्रतिवादीचे कर्तव्य असतानाही प्रतिवादीची तशी मानसिकता दिसत नाही. वीज कायदा २००३ मधील कलम ४३(१),४३(२) व ४३(३) नुसार वीज पुरवठा वेळेत न दिल्यास **विलंबाच्या प्रतीदिन रु.१०००/- चे दंड आकारण्याची तरतूद आहे.** माननीन सर्वोच्च न्यायालयाने देखील सिव्हिल अपील क्र.७५७२/२०११ मध्ये निकाल देऊन या प्रकरणाचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

- अपिलार्थीने दिनांक २ सप्टेंबर २०२३ रोजी त्यांच्या वकीलामार्फत प्रतिवादीस नोटीस पाठवून दिलेले वीज देयक मागे घेऊन लवकरात लवकर वीज जोडणी देण्यात यावो तसेच, वीज जोडणी न देता वीज देयक कोणत्या आधारे पारित केले याचे स्पष्टीकरण मागितले असता, प्रतिवादीने त्याकडे दुर्लक्ष करून कायदयाचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे अपिलार्थीने सदर तक्रार मंचाकडे दाखल केली. मंचानेही सदर तक्रार नामंजूर केली. म्हणून अपिलार्थीने दिनांक दिनांक १४ ऑगष्ट २०२५ रोजी माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयामध्ये अभिवेदन सादर केले.

- अपिलार्थीने त्याच्या अभिवेदनाद्वारे माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे खालीलप्रमाणे मागण्या केल्या आहेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- प्रतिवादीने दिलेले खोटे वीज देयक रद्द करण्यात यावे व तात्काळ वीज जोडणी देण्यात यावी.
- प्रतिवादीकडून सरकारी अनुदानाची रक्कम लाटली असल्यास ती वसूल करावी व प्रतिवादीवर कठोर कारवाई करावी.
- वीज कायदा २००३ मधील अधिनियमाना अधीन राहून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालीटी) विनियम २०२१ मधील विनियम ५.८ नुसार अपिलार्थीने नवीन वीज जोडणीसाठीचा **कोटेशनचा भरणा केल्यापासून पुढील ३० दिवसाच्या आत वीज जोडणी देणे बंधनकारक आह; तसेच, नवीन वीज जोडणी काम उभारून दयावयाचे असेल तर ९० दिवसात वीज जोडणी देणे बंधनकारक आहे.** असे असतानाही, सदर प्रकरणी प्रतिवादी वीज जोडणी देण्यास अपयशी ठरलेल आहेत. त्यामुळे वीज कायदा २००३ चे कलम ४३(१) प्रमाणे रू.१०००/- प्रती दिन प्रमाणे नुकसान भरपाई देण्यास प्रतिवादी बांधील आहेत. सपर्ण प्रकरणाची शहानिशा करून अपिलार्थीस योग्य तो न्याय द्यावा.

३. माननीय विद्युत लोकपाल यांनी दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या ई-सुनावणीदरम्यान सदर जागेचा स्थळ तपासणी अहवाल सादर करण्याचे प्रतिवादीना आदेशीत कले होते. त्यानुसार दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या किशोर दयाराम पाटील, पोलीस पाटील, मुखेड ता.शिरपूर, जिल्हा धुळे यानी श्री सुनील नागो धनगर व श्री धनराज जगन्नाथ पाटील यांच्यासमोर केलेल्या पचंनामामध्ये नमुद केले की, सदर जागी महावितरणमार्फत पायाभूत सुविधा उभारणे झाली असून तेथे ७.५ अश्वशक्तीचे वीज जोडणी आढळून आली असून सदर क्षेत्रात जवळपास २ वर्षे व अधिक कालावधीपासून शेतीपंपासाठी वापर होत आह. सदर क्षेत्र हे अंजनाबाई भिमराव बोरसे यांचे आहे. त्याबाबतचे दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजीचे स्थळतपासणीचे फोटो रेकॉर्डवर ठेवलेले आहेत.

**विश्लेषण व निर्णय**

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. वरील प्रकरणाचा अभ्यास केला. अपिलार्थीच्या वीज जोडणीबाबतची माहिती तक्ता १ मध्ये दिली आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

५. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थींनि नवीन कृषी वीज जोडणीकरीता दिनांक १३ ऑगष्ट २०२१ रोजी महावितरण शिरपूर कार्यालयाकडे अर्ज केला. त्यानंतर अपिलार्थीने कोटेशनचा भरणा दिनांक १८ सप्टेंबर २०२१ रोजी केला. अपिलार्थींसोबत वरील तक्ता २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अन्य ग्राहकांचे शेतीपंपासाठी नवीज वीज जोडणीचे अर्ज आले. त्यानुसार एबी केबल द्वारे पाचही ग्राहकांना दिनांक ३0 मार्च २0२३ रोजी Unmetered Tariff नुसार वीज जोडणी देण्यात आली. त्याचे पुरावे सुध्दा सादर केलेले आहेत. वर नमुद केलेल्या पाचही ग्राहकाने दिनांक ३0 मार्च २0२३ रोजी वीज जोडणी मिळाल्याचे लिहून दिलेले आहे. कृषीपंप ग्राहकांचे बिलींग हे त्रैमासीक पध्दतीचे असून माहे जून २0२३ त्रैमासीक चे प्रथम वीज देयक देण्यात आले. अपिलार्थीने सदर वीज देयकांचा भरणा कधीही केला नाही. किशोर दयाराम पाटील, पोलीस पाटील, मुखेड यांच्या समक्ष महावितरणने केलेल्या पंचनाम्यानुसार सदर जागी महावितरणतफ पायाभूत सुविधा उभारणो झाली असून तेथे ७.५ अश्वशक्तीचो वीज जोडणी असल्याचे आढळून आल आहे. सदर क्षेत्र हे अंजनाबाई भिमराव बोरसे यांचे असून त्या जागी जवळपास २ वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून शेतीपंपासाठी वीज वापर होत आहे.

६. अपिलार्थीने नमुद केले की त्यांनी दिनांक १३ ऑगष्ट २०२१ रोजी नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केला व दिनांक १८ सप्टेंबर २०२१ रोजी कोटेशनचा भरणा केला. परंतू वीज कायदा २००३ मधील नियमावलीमध्ये नमुद केलेल्या कालावधीत अपिलार्थीस वीज पुरवठा दिला नाही. प्रतिवादी, माननीय आयोगाच्या निर्देशानूसार भरपाईसह अपिलार्थीस वीज पुरवठा देण्यास बांधील आहे. वीज जोडणीसाठी अपिलार्थीने प्रतिवादीकडे पाठपुरावा केला असता, प्रतिवादीकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. प्रतिवादीने अपिलार्थीस दिलेले खोटे वीज देयक रद्द करण्यात यावे व तात्काळ वीज जोडणी देण्यात यावी अशी मागणी केली.

७. सर्व कागदपत्रांच अवलोकन पडताळणी केला असता असे दिसते की, दिनांक ३0 मार्च २0२३ रोजी देण्यात आलेल्या वीज जोडणीच्या वेळी प्रतिवादीन अपिलार्थीची सही घेणे आवश्यक होते; परंतू असे झाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीसोबत अन्य पाच ग्राहकांनासुध्दा वीज जोडणी ही दिनांक ३0 मार्च २0२३ रोजी दिली. सदरहू वीज जोडणी दिनांक ३0 मार्च २0२३ दिल्याचे त्या पाच ग्राहकाने लेखी जबाबाद्वारे कबूल केले आहे. किशोर दयाराम पाटील, पोलीस पाटील, मुखेड यांच्या समक्ष केलेल्या

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

पंचनाम्यानुसार वीज जोडणी दोन वर्षापुर्वी म्हणजे २०२३ सालो दिल्याचे दिसते. प्रत्यक्ष तपासणी अहवाल व सदर जागेवरील फोटो व त्यावरील बागायतीचा फोटो दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी असल्याचे दिसते. हे सर्व मुद्दे विचारात घेता अपिलार्थीस दिनांक ३० मार्च २०२३ रोजी वीज जोडणी दिल्याचे सिध्द होते.

८. सबब, अभिवेदनातील अपिलार्थीच्या सर्व मागण्या फेटाळण्यात येऊन अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai.
M.E.R.C.